परिपत्रक क्रमांक २९५ दिनांक २४/३/१९९९

विषय :- संगणक प्रशिक्षणाबाबत

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमुंक १०९८/प्र.क्र.१३४/९८/३९ दिनांक ३/३/१९९९ अन्वये संगणक प्रशिक्षण घेण्यासाठी विशिष्ठ पाठयक्रमांना मान्यता देण्यांत आलेली आहे. सदरहू पाठयक्रमांची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना प्रोत्साहनात्मक रक्कम अनुज्ञेय आहे.

मार्च, २००० पूर्वी धर्मादाय संघटनेतील कामकाजाचे संगणकीकरण करण्याचा प्रस्ताव असून संगणक खरेदीची प्रक्रिया सुरु आहे. त्यासाठी संघटनेतील अधिकारी व कर्मचारी यांनी संगणकाचे प्रशिक्षण धेणे क्रमप्राप्त आहे.

वर नमूद केलेल्या शासन निर्णयामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या दोन अभ्यासक्रमामध्ये प्रशिक्षण घेण्यास मान्यता दिलेली आहे. प्रत्येक स्तरावरील कर्मचाऱ्यांना संगणकाचे प्रशिक्षण घेणे सोयीचे व्हावे, यासाठी ए.डी.सी.सी. कन्सलटन्सी सर्व्हिसेस प्रा. लि. (ऋक्र.क.क.क्दृदद्मद्वथ्यड्ढदड़्र च्ड्ढद्धध्ड़ड्ढद्म घ्ध्य. ख्ध्यड्ड.) या संस्थेमार्फत सदरचा अभ्यासक्रम एप्रिल, १९९९ पासून धर्मादाय आयुक्त भवनांत सुरु करण्याचा मानस आहे.

सर्टीफिकेट इन ऑफिस ऑटोमोशन झ्रक्ड्ढद्धद्यत्ढत्ड़ड्ढद्यड्ड त्द ग्रढत्ड़ड्ड ऋद्धद्यदृथ्ड्ढद्यत्दृदट या अभ्यासक्रमामध्ये प्रशिक्षण घेणारे अधिकारी/ कर्मचारी यांना हे प्रशिक्षण ३ महिन्यात पूर्ण करावयाचे आहे. प्रशिक्षणाचा कालावधी शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळता दररोज २ तास इतका आहे. या प्रशिक्षणासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाकडून आकारण्यांत येणारी फी रु.५०००/- आहे. प्रशिक्षण फीसाठी शैक्षणिक कर्ज उपलब्ध करण्याची योजना संस्थेने दिली असून, त्यानुसार या योजनेमध्ये सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुरुवातीस रु.४५६/-एवढी शुल्क भरावयाची असून, रु.५०००/- ही रक्कम सुलभ हप्त्यांत परत करता येईल.

तरी ज्या कर्मचाऱ्यांना एप्रिल, १९९९ पासून सुरु होणाऱ्या अभ्यासक्रमांत प्रशिक्षण घ्यावयाचे आहे, त्यांनी आपली संमती दिनांक ३१/३/१९९९ पर्यंत आस्थापना शाखेस कळवावी.

सही/-
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकरीता.